*e-Library Science Research Journal*
Vol.1,Issue.4/Feb. 2013 ISSN : 2319-8435

**Research Papers**

# ग्रंथालय चळवळीचे जनक – " डॉ. एस. आर. रंगनाथन "

**योगेश प्रकाश सुरवाडे**

ग्रंथालय व माहीती शास्त्रा विभाग
का . ना . पा . पशुवैदयकिय महाविदयालय शिरवळ जि . सातारा

***सारांश***

डॉ . रंगनाथन यांचा जन्म **09** ऑगस्ट **1892** रोजी तत्कालीन मद्रास प्रांतातील तंजावर जिल्हयात शियाली या गावी झाला . शालेय शिक्षण शियालीला आणि महाविदयालयीन शिक्षण मद्रास येथे होऊन **1916** साली त्यांनी गणित या विषयात पदवी मिळविली . अध्यापनाची त्यांना आवड होती . म्हणुन त्यांनी अध्यापन हे आपले कार्यक्षेत्रा निश्चीत केले आणि शिक्षण शास्त्रातील **1917** साली मद्रास विदयापिठाची एल . टी . ही पदवी प्राप्त केली आणि शिक्षक म्हणून गणिताचे प्राध्यापकाचे काम सहा वर्षे केले . या काळातच एक कुशल प्राध्यापक आणि संशोधक म्हणुन त्यांनी मान मिळविला . **1924** साली प्रेसिडेन्सी कॉलेजमधील नोकरी सोडुन मद्रास विदयापिठाचे ग्रंथपाल म्हणुन ते सेवेत रूजु झाले तेव्हा पासुन आयुष्याच्या अखेरपर्यंत प्रत्येक क्षण त्यांनी ग्रंथालयाच्याच कारणी लावला . त्यांच्या ग्रंथालय कामाचा कार्याचा आढावा घेण्यासाठी ग्रंथपाल ग्रंथालय चळवळीचे जनक अध्यापक आणि लेखक अशा दृष्टीकोनातून त्यांचा विचार करणे आवश्यक आहे .

## *प्रस्तावना*

मद्रास विदयापिठाने त्यांना **1924** सप्टेंबर ते **1925** जुलै या कालखंडात ग्रंथालयाच्या प्रशिक्षणासाठी आणि इंग्लंडमधील ग्रंथालयाचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडला पाठविले . इंग्लंडमधील वास्तव्यात नामवंत ग्रंथपाल बटविक सेयर्स यांचेशी त्यांचा संबंध आला . याशिवाय अनेक ग्रंथालयांना भेटी देवुन ग्रंथालये कशी समाजकेंद्रे बनली आहे हे त्यांनी प्रत्यक्ष अनुभवले . ग्रंथालयामध्ये समाजातील सर्व थरांचे वाचकांना बालके महीला कामगार सेवा कशी दिली जाते हेही पाहीले .

### ग्रंथालय पुनर्रचनेचे कार्य :-

लंडन येथे एक वर्ष राहुन तेथील युनिव्हर्सिटी कॉलेजचा ग्रंथालय शास्त्राचा अभ्यासक्रम पुर्ण करून **1925** साली मायदेशी परतल्यावर रंगनाथन यांनी विदयापिठाच्या ग्रंथालयाच्या पुनर्रचनेचे कार्य जोमाने सुरू केले . विविध कार्यक्रम व उपक्रमाव्दारे ग्रंथालयात चैतन्य आणले आणि अनेक वाचकांना ग्रंथालयाकडे आकृष्ट केले . अध्यापक आणि विदयार्थी यांना ग्रंथालयाचा अधिकाधिक लाभ घेता यावा या साठी दिवसाचे **13** तास रविवार धरून कोणतीही सुटटी न घेता ग्रंथालय उघडे ठेवण्यास डॉ . रंगनाथन यांनी सुरूवात केली . याच कालखंडात त्यांनी ग्रंथालयशास्त्राचे पाच सिदधांत वापरात आणले . **1)** ग्रंथ हे उपयोगासाठी आहे . **2)** प्रत्येक वाचकाला त्याचा ग्रंथ मिळाला पाहीजे . **3)** प्रत्येक ग्रंथाला त्याचा वाचक मिळाला पाहीजे . **4)** वाचकाचा वेळ वाचवा . **5)**ग्रंथालय ही वर्धिष्णु संस्था आहे .

तसेच त्यांच्या व्दिबिंदू वर्गीकरण पध्दतीनुसार कपाटात ग्रंथाची मांडणी करून तिला पुरक म्हणुन तितक्याच शास्त्रीय वर्गीकृत सुचीची जोड दिली . आणि मद्रास विदयापिठ ग्रंथालयाचा त्यांनी प्रयोगशाळा म्हणुन उपयोग केला . वाचकांना ग्रंथाच्या कक्षेपर्यंत मुक्त प्रवेश दिला या सर्व सुविधांचे स्वागत आणि यश ग्रंथालयात नियमित येणाया वाचकांच्या संख्येत वर्षभरातच झालेल्या भरघोस वाढीवरून सिदध झाले . पण या सोयी सुविधात त्यांचा स्वतःचा किंवा ग्रंथालयातील इतर प्रशिक्षीत सेवकांचा वाचकांशी प्रत्यक्ष संपर्क येत नव्हता . तसा तो यावा म्हणुन आपल्या प्रशिक्षीत सहकायांना साथीला घेऊन त्यांनी वाचकांना संदर्भसेवा पुरविण्यास सुरूवात केली . वाचक हा केंद्रबिंदु मानुन त्याला ग्रंथालयीन सहाय्य पुरविण्याचे प्रयत्न रंगनाथन यांनी केली . आणि या काळात त्यांनी कोलन क्लासिफिकेशन क्लासिफाईड कॅटलॉग कोड आणि लायब्ररी ॲडमिनीस्ट्रेशन असे तीन प्रमुख ग्रंथ लिहीले .

### ग्रंथालय संघ :-

मद्रासच्या वास्तव्यात त्यांनी भारतातील ग्रंथालय चळवळीचा पाया घातला . मद्रास विदयापिठाच्या ग्रंथालयाचा कायापालट करीत असतानाच रंगनाथन यांच्या मनात सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रसाराचा विचार सुरू असे . आर्थिक विकासाला आणि लोकशाहीच्या प्रगतीला शिक्षण प्रसाराइतकी मुलभूत कोणतीही प्रेरणा नाही अशी त्यांची खात्री होती . समाजातील सर्व थरांत शिक्षण प्रसारासारखी म्हणजेच ज्ञानाचे लोकशाहीकरण करण्यासाठी ग्रंथालयाइतके सहाय्यक दुसरे कोणतेही

Vol.1,Issue.4/Feb. 2013

माध्यम नाही अशी त्यांची धारणा होती . हे जाणून त्यांनी मद्रास ग्रंथालय संघाची स्थापना **1928** मध्ये केली व या संघाचे चिटणीस व पदाधिकारी म्हणून **1945** पर्यंत काम केले . या संघाच्या स्थापनेची आणि त्याच्यातर्फे मांडल्या जाणाया विविध योजनांपासुन स्फुर्ती घेऊन इतर राज्यात ग्रंथालय संघ स्थापन केले .

**कायदयाच्या आवश्यकतेची जाणीव :-**

त्यांच्या विविध उपक्रमामुळे ग्रंथालयाच्या आवश्यकतेची जाणीव समाजात निर्माण होवू लागली आणि यासाठी प्रत्येक राज्यात सार्वजनिक ग्रंथालये स्थापन करण्यासंबंधी कायदयाची जाणीव निर्माण झाली आणि मद्रासमध्ये सार्वजनिक ग्रंथालय कायदा आणण्यात त्यांनी पुढाकार घेतला . त्यामुळे दक्षिण भारतात सार्वजनिक ग्रंथालयाची वाढ मोठया प्रमाणावर झाली . त्यांचे प्रेरणेने ग्रंथालय कायदा करणारे मद्रास राज्य हे पहीले राज्य आहे .

**ग्रंथालय प्रशिक्षणाची व्यवस्था :-**

ग्रंथालयाचा कारभार वाढू लागल्याने व ग्रंथालयाची संख्या वाढू लागल्याने विविध पातळीवर प्रशिक्षित कर्मचायांची गरज लागणार आणि त्यांची उणीव ग्रंथालयाच्या स्थापनेच्या आड येवू नये म्हणुन त्यांनी ग्रंथालय शास्त्रा शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवली . ग्रंथपालन वर्ग प्रथम मद्रास ग्रंथालय संघातर्फे आणि त्यानंतर मद्रास विदयापिठ ग्रंथालयातर्फे चालवले . या वर्गाचे ते **15** वर्षे संचालक होते .

बनारस हिंदू विश्वविदयालयातही ग्रंथालयशास्त्राचे पदव्युत्तर शिक्षण रंगनाथन यांनी सुरू केले . दिल्ली विदयापिठात ग्वायर कुलगुरू असताना त्यांनी त्या विदयापिठात **1947** साली ग्रंथालयशास्त्राचा एका उच्चस्तरीय अभ्यासक्रम आयोजीत करण्यासाठी बोलावले होते . त्याप्रमाणे बॅचलर्मास्टर ऑफ लायब्ररी सायन्स आणि डॉक्टर ऑफ लायब्ररी सायन्स हे अभ्यासक्रम रंगनाथन यांनी दिल्ली विदयापिठात सुरू केले . याच वास्तव्यात त्यांची भारतीय ग्रंथालय संघाचे अध्यक्षपदी निवड झाली . या ग्रंथालय संघातर्फे त्यांनी तीन मासिके सुरू केली . ग्रंथपाल होण्यापूर्वीपासुनच एक कुशल शिक्षक अशी रंगनाथन यांची ख्याती झालेली होतीच . मद्रास वाराणसी आणि दिल्ली येथे त्यांच्याकडुन ग्रंथालयशास्त्रा शिकण्याची संधी मिळालेले ग्रंथपाल स्वत :ला भाग्यवान समजतात ही त्यांची प्रचिती आहे .

**विविध कर्तृत्वाचे मानकरी :-**

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांच्या कामाच्या व संशोधन कार्याची योग्य दखल घेवुन ब्रिटीश राजवटीत **1935** साली त्यांना रावसाहेब हा किताब मिळाला त्यानंतर **1957** साली त्यांनी स्वकष्टाने जमा केलेले **1** लाख रूपये मद्रास विदयापिठाला देणगी म्हणून दिले . त्यामधुन ग्रंथालय शास्त्राची शारदा रंगनाथन प्रोफेसर ऑफ लायब्ररी सायन्स ही चेअर प्रस्थापित केली . **1957** मध्ये पदमश्री देवुन भारत सरकारने त्यांचा गौरव केला . त्यांच्या मौलिक लिखाणाबद्दल डी . लिट् . ही सर्वोच्च पदवी **1947** साली दिल्ली आणि **1964** साली अमेरीकेतील पिट्सबर्ग विदयापिठाकडून त्यांना मिळाली . वर्गीकरण व तालीकीकरण या विषयातील संशोधनाबद्दल त्यांना **1970** साली अमेरीकन लायब्ररी असोसिशन कडुन ' मार्गरिड ' मानपारीतोषिकही देण्यात आले होते . प्रत्येक आंतरराष्ट्रीय संस्थेने तज्ञ या नात्याने वेळोवेळी त्यांचा सल्ला घेतला आणि त्यांच्या मार्गदर्शनाचा स्वागतपुर्व स्वीकार केला .

रंगनाथन यांनी भारतीय चळवळही वाढविली . भारतीय ग्रंथालय संघाचे अध्यक्ष अबगिलाचे संपादक व ग्रंथालय परिषदांचे अध्यक्ष अशा विविध नात्यांनी त्यांनी मौलिक कामगिरी बजावली . युनो युनेस्को इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ असोसिएशन इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ डॉक्युमेंटेशन या सारख्या आंतरराष्ट्रीय समित्यांवरही त्यांनी गौरवास्पद कामगिरी केली . विदयापिठ अनुदान मंडळाच्या ग्रंथालय समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी महत्वपुर्ण कामगिरी बजावली . युरोपमधील विदयापिठात व्याख्याने दिली आणि प्रोलेगोमेना टू लायब्ररी क्लासिफिकेशन हा मौलिक ग्रंथ लिहीला .

ग्रंथालयांशी रंगनाथन यांचे इतके तादाम्य झाले होतेतरी विदयार्थी दशेत रूजलेले आणि आयुष्यातील पहील्या व्यवसायात दृढ झालेले गणितावरचे त्यांचे प्रेम अखेरपर्यंत तिळमात्रा कमी झाले नाही . आयुष्यभर विविध विषयावर विपुल लिखाण केले . " लायब्ररीयन लुक्स बॅक " हा आत्मचरीत्रापर ग्रंथ **53** ग्रंथ **1500** लेख मासिकांचे संपादन आणि अनेक समित्यांमध्ये काम करून अहवाल सादर केले . लायब्ररी सायन्स इन इंडीयन युनिर्व्हसिटीज हा अहवाल महत्वाचा आहे . कोलन वर्गीकरण पाच पैलु पृथ्थकरण संयोजन क्षमता वर्गीकृत तालीका संहिता विषय शिर्षकाची साखळी पध्दती सखोल वर्गीकरणांचे तंत्रा संदर्भ सहाय्य व प्रलेखन यावर सखोल मार्गदर्शनपर ग्रंथे त्यांनी प्रसिध्द केली . जगामध्ये ग्रंथालयशास्त्रात नावलौकिक कमावणारे प्रथम भारतीय ग्रंथपाल ग्रंथालय चळवळीचे जनक पितामह सार्व जनिक ग्रंथालय चळवळीचे प्रमुख प्रवर्तक म्हणून मानतात . केवळ ज्यांच्या एकटयाच्या कर्तृत्वामुळे भारताला ग्रंथालय क्षेत्रात जागतिक प्रतिष्ठा प्राप्त झाली . त्या डॉ . एस . आर . रंगनाथन यांच्या **9** ऑगस्ट या जन्मदिनानिमित्त आणि ग्रंथपाल दिनानिमित्त मराठी भाषिक ग्रंथालय प्रेमीसांठी त्यांच्या जीवनाचा व जिवीतकार्याचा थोडक्यात परीचय देत आहे .

Vol.1,Issue.4/Feb. 2013



# भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक
# डॉ.एस.आर.रंगनाथन

